जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/ ९८८ /२०२०

प्रेसनोट

दिनांक -१३ /०६/२०२०

भोसरी वाहतुक विभाग अंतर्गत भोसरी गाव येथील पुणे नाशिक महामार्गावरील भोसरी पुलाचे खाली असलेल्या भोसरी चौकामध्ये नेहमी वाहतुकीची कोंडी होत असते.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी सुधीर हिरेमठ पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिपंरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन **तात्पुरत्या** स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

- आळंदी रोडवरुन येणा-या वाहनांना अंकुशराव लांडगे सभागृह व चाकणकडे जाण्यासाठी चौकामध्येच **Right Turn बंद** (उजवी कडे वळण्यास बंदी) करुन त्यांनी डावीकडे वळण घेवुन पुढे ५० मीटर वरील पीएमटी चौकातुन उजवीकडे वळुन इच्छित स्थळी जातील.

तरी, नागरिकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास, त्या पोलीस-उप आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड, पुणे यांचे कार्यालयात दिनांक. १४/०६/२०२० ते दि. २८/०६/२०२० रोजी पर्यत लेखी स्वरुपात पाठविण्यात याव्यात. नागरिकांच्या कडून प्राप्त सुचना व हरकती यांचा विचार करुन अंतिम आदेश काढण्यात येईल.

Hiremath

(सुधीर हिरेमठ) भा.पो.से.
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी भोसरी वाहतुक विभाग

४) कार्यकारी अभियंता, क्षेत्रिय कार्यालय, पुणे.
/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with CamScanner